# Washim District Police

**Nature of Work** :- **Arresting Accuse With stolen Property**

**Police Station** :- **Washim City**

**Date of Good Work done** :- **01/04/2020**

**Brief of the work done :-**

वाशीम शहर चोरीच्या मुद्देमालासह आरोपी अटक दि. ०१/०४/२०२०

## चोरी प्रकरणातील आरोपीस मुद्देमालासह अटक

**वाशिम** ■ तालुका प्रतिनिधी

❖ वाशिम शहर पोलिसांची कारवाई
❖ आरोपीकडून १३ हजाराचा मुद्देमाल जप्त

येथील पंचशिलनगर भागातील महर्षी संत गाडगे महाराज मराठी प्राथमिक शाळेत चोरी करुन २१ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास करणाऱ्या आरोपीस वाशिम शहर पोलिस स्टेशनच्या पथकाने अटक करुन मुद्देमाल जप्त केला.

येथील महर्षी संत गाडगे महाराज मराठी प्राथमिक शाळेत २९ मार्च रोजी रात्रीच्या दरम्यान अज्ञात चोरट्यांनी चोरी करुन शाळेच्या स्टोअर रुममधील तांदुळ, एमप्लीफायर मशीन, दोन स्पीकर, माईक, केबल, ब्लॅंकेट व किराणा माल असा एकुण २१ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला होता. या चोरीच्या घटनेनंतर लगेच ठाणेदार योगिता भारव्दाज यांच्या मार्गदर्शनाखाली एएसआय गणेश सरनाईक,नापोकॉ उमाकांत सरोदे, प्रशांत अंभोर, रामेश्वर नागरे, विजय शिनगारे, ज्ञानदेव मात्रे, विठ्ठल महल्ले, मनोज चव्हाण,आनंद चोपडे यांनी तपास करुन आरोपी हरिष कांबळे यास अटक करुन चोरी गेलेला एमप्लीफायर मशीन, दोन स्पीकर, माईक, केबल, असा १३ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.



अटक करण्यात आलेल्या आरोपीसह तपासपथकातील पोलिस कर्मचारी

ePaper देशोन्नती Thu, 02 April 2020 https://deshonnati.digitaleditior

## चोरीच्या मुद्देमालासह आरोपीस अटक

**वाशीम, ता. १ :** शाळेचे लोखंडी ग्रील वाकवून अज्ञात चोरट्यांनी २१ हजार ५०० रुपयांचा ऐवज लंपास केला होता. याबाबत दाखल फिर्यादीवरून गुन्हा नोंदवून प्रकरण तपासात घेतले होते. या घटनेतील चोरट्यास मुद्देमालासह पोलिस पथकाने मंगळवारी (ता.३१) अटक केली आहे.



वाशीम : चोरट्यासह ताब्यात घेतलेल्या वस्तू.

हर पोलिस ठाण्यांतर्गत येणाऱ्या पंचशिलनगर भागातील महर्षी संत गाडगे महाराज मराठी प्राथमिक शाळेत ता. २९ मार्च २०२० ला चोरी झाली होती. चोरट्याने शाळेच्या खिडकीचे ग्रील वाकवून स्टोअर रुममधील तांदूळ, एम्प्लीफायर मशीन, दोन स्पीकर, माईक केबल, ब्लॅंकेट व किराणा माल असा एकूण २१ हजार ५०० रुपयांचा ऐवज लंपास केला होता. याबाबतची फिर्याद मुख्याध्यापक नंदू वाघ यांनी दाखल केली होती. या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करून प्रकरण तपासात घेतले होते. या प्रकरणी मंगळवारी (ता.३१) पोलिस पथकाने हरीश संतोष कांबळे (वय२२, रा. पंचशीलनगर वाशीम) यास ताब्यात घेतले. तसेच त्याच्याकडून एम्प्लीफायर मशीन, दोन स्पीकर, माईक केबल असा १३ हजाराचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई पोलिस अधीक्षक वसंत परदेशी, अपर पोलिस अधीक्षक विजयकुमार चव्हाण, सहाय्यक पोलिस अधीक्षक डॉ. पवन बन्सोड, ठाणेदार योगीता भारद्वाज यांच्या मार्गदर्शनात एएसआय गणेश सरनाईक, उमाकांत केदारे, प्रशांत अंभोरे, रामेश्वर नागरे, विजय शिनगारे, ज्ञानदेव मात्रे, विठ्ठल महाले, मनोज चव्हाण, आंद चोपडे यांच्या पथकाने केली.